अहवाल दिनांक : 31/10/2018

गाव नमुना सात

अधिकार अभिलेख पत्रक

(महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ यातील नियम ३, ५, ६ आणि ७)

गाव - बानाडोंगरी त.सा.क्र.
46 तालुका :- हिंगणा जिल्हा :- नागपूर
गट क्रमाक व उपविभाग : 100/1

गट क्रमांक व उपविभाग	भुधारणा पद्धती	भोगवटदाराचे नांव
100/1	भोगवटादार वर्ग -I	

शेतीचे स्थानिक नांव	क्षेत्र आकारआणे पै पो.ख. फे.फा	खाते क्रमांक
क्षेत्र एकक आर चौ.मी	निशा मनोज गोलावार (182)	194
बिन शेती 237.00.00	मनोज वसंतराव गोलावार (2513)	कुळाचे नाव
बिन शेती 1450.00		इतर अधिकार
आकारणी	------सामाईक क्षेत्र------ 237.00 001450.00	अकृषिक वापर - रहिवास (गावठाणाबाहेरील)
जिरायत -		मा. जिल्हाधिकारी नागपुर यांचे
बागायत -		रा.मा.क्र. 247/ एन.ए.पी. 34/ (784)
तरी -		2003-04 दि. 13.04.04 अन्वये
वरकस -		निवासी वापरास मंजुरी (784)
इत्तर -		इतर - खरेदी हक्कामुळे नाव दर्ज
एकुण क्षेत्र -		आदेशान्वये आराजी कमी दि. 02.11.07 (3084)
पोटखराब (लागवडीस अयोग्य)		इतर
वर्ग (अ) -		कलम २०-1-अ अन्वये तळेगाव दाभाडे भूखंड विकास योजनेखालील क्षेत्र (10010)
वर्ग (ब) -		

Smt A. M. Golawar.

11/1/2018 1:49 AM

५२६
~~५२६~~

क्र अका/युएलसी/कावि /२००९
अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी
नागरी जमीन कमाल धारणा कार्यालय
नागपुर दिनांक २९/०६/०९

प्रति,

१) मुख्यधिकारी,
गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपुर.
२) सचीव,
ग्राम पंचायत वानाडोंगरी.

विषय :- तळेगाव दाभाडे योजनेअंतर्गत शासनास विनामुल्य प्राप्त झालेल्या क्षेत्राबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मौजा **वानाडोंगरी** येथील सर्वे नंबर, १०० आराजी २७५०० चौ.मी जमीनीवर इकडील कार्यालयाचे आदेश क्र **एटीपी/युएलसी/टिडी (५७१)/२००५/१३०७, दिनांक ७/१०/२००५** रोजी तळेगाव दाभाडे भुखंड विकास योजना मंजुर करण्यात आलेली आहे.

या योजनेअंतर्गत **शासनास विनामुल्य** ५२७५.०० चौ.मी क्षेत्र प्राप्त झालेले असून उक्त क्षेत्र जमीन मालकाने बाजारमुल्य किंमत शासनाकडे जमा करुन परत मिळण्याबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने उक्त जमीन जमीनमालकास परत देण्याबाबत स्थानिक नियोजन प्राधिकरण या नात्याने आपली काही हरकत आहे किंवा कसे याबाबत हे पत्र प्राप्त झाल्यापासुन सात दिवसाचे आंत कृपया या कार्यालयास कळविण्यात यावे.

30/6/09
सहायक नियोजक
नागपूर मेट्रोपॉलिटन क्षेत्रविकास
मंडळ, नागपूर.

अपर जिल्हाधिकारी तथा
सक्षम प्राधिकारी नाजकधा, नागपुर

(59) (2) (92)

नगरपरिषद वानाडोंगरी
ता.हिंगणा जि.नागपूर

जावक क्र.न.प.वाना/बांध 2582
दिनांक 19/12/२०१८

प्रति,
मा.सहायक संचालक,
नगर रचना, नागपूर

विषय :– सर्वे कमांक १००, मौजा – वानाडोंगरी, तहसील – हिंगणा, जि. नागपूर चा अभिन्यासाला मंजुरी मिळणेबाबत.

संदर्भ :– श्री मनोज गोलावार व इतर यांचा दिनांक २/११/२०१८ चा अर्ज

महोदया,

वानाडोंगरी नगर परिषदेला, श्री. मनोज गोलावार व इतर यांनी दि.०२/११/२०१८ रोजी विहित नमुन्यात अर्ज सादर करुन, मौजा – वानाडोंगरी येथील सर्वे क्रमांक १०० च्या अभिन्यासाला मंजुरी अपेक्षीलेली आहे.त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन करता अर्जा सोबत सादर करण्यात येत आहेत.

१. अभिन्यास ४ प्रतीत
२. सात बारा उतारा – सर्वे क. १००/१ व १००/२ प्रत्येकी एक प्रत
३. मोजनी नकाशाची – १ प्रत (दि:१४/३/२०१८)
४. विकी पत्र – १ प्रत
५. डीमार्केशसन करिता शिफारशगरीचा, सहायक संचालक, नगर रचना यांनी मंजूर केलेल्या अभिन्यासाची प्रत
६. यु.एल.सी. कार्यालयाकडून दि.७/१०/२००५ मंजूर केलेल्या अभिन्यासाची प्रत
७. नागपूर सुधार प्रन्यास ने प्रसिध्द केलेल्या प्रस्तावित जमीन वापर नकाशाची प्रत (वानाडोंगरी न.प. चा भाग असलेला)

कृपया वरील कागद पत्रानुसार अर्जदाराची प्रस्तावित जमीन न.प. वानाडोंगरी करीता सध्या लागु असलेल्या प्रादेशीक विकास योजनेत कृषी विभागात असल्याचे दिसुन येत आहे.

तथापी आपल्या स्तरावर प्रकरणाची छाननी करुन तसे मार्गदर्शन लवकरात लवकर करण्यात यावें हि विनंती.

सहपत्र : १ ते ७ मध्ये नमूद करण्यात आलेल्या
कागदपत्राची प्रत्येकी एक प्रत

आपला विश्वासु
11.12.18
मुख्याधिकारी
नगर परिषद वानाडोंगरी

(93)

नगरपरिषद वानाडोंगरी
ता.हिंगणा जि.नागपूर

जावक क.न.प.वाना/बांध 252
दिनांक 14/12/२०१८

प्रति,
सहायक संचालक,
नगर रचना, नागपूर

विषय :– सर्वे क्रमांक १००, मौजा – वानाडोंगरी, तहसील – हिंगणा, जि. नागपूर चा अभिन्यासाला मंजुरी मिळणेबाबत.

संदर्भ :– श्री मनोज गोलावार व इतर यांचा दिनांक २/११/२०१८ चा अर्ज

महोदया,

वानाडोंगरी नगर परिषदेला, श्री. मनोज गोलावार व इतर यांनी दि.०२/११/२०१८ रोजी विहित नमुन्यात अर्ज सादर करुन, मौजा – वानाडोंगरी येथील सर्वे क्रमांक १०० च्या अभिन्यासाला मंजुरी अपेक्षीलेली आहे.त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता अर्जा सोबत सादर करण्यात येत आहेत.

१. अभिन्यास ३ प्रतीत
२. सात बारा उतारा – सर्वे क. १००/१ व १००/२ प्रत्येकी एक प्रत
३. मोजनी नकाशाची – १ प्रत (दि.१४/३/२०१८)
४. विकी पत्र – १ प्रत
५. डीमार्केशसन करिता शिफारशगरीचा, सहायक संचालक, नगर रचना यांनी मंजूर केलेल्या अभिन्यासाची प्रत
६. यु.एल.सी. कार्यालयाकडून दि.७/१०/२००५ मंजूर केलेल्या अभिन्यासाची प्रत
७. नागपूर सुधार प्रन्यास ने प्रसिध्द केलेल्या प्रस्तावित जमीन वापर नकाशाची प्रत (वानाडोंगरी न.प. चा भाग असलेला)

कृपया वरील कागद पत्रानुसार अर्जदाराची प्रस्तावित जमीन न.प. वानाडोंगरी करीता सध्या लागु असलेल्या प्रादेशीक विकास योजनेत कृषी विभागात असल्याचे दिसुन येत आहे.

तथापी आपल्या स्तरावर प्रकरणाची छाननी करुन तसे मार्गदर्शन लवकरात लवकर करण्यात यावे हि विनंती.

सहपत्र : १ ते ७ मध्ये नमूद करण्यात आलेल्या कागदपत्राची प्रत्येकी एक प्रत

प्राप्त
लिपीक
दि. 20/12/2018
द्वारा सहायक संचालक
नगर रचना, नागपूर
प्रशासकीय इमारत २ रा मजला
सिव्हील लाईन, नागपूर

आपला विश्वासु
11.12.18
मुख्याधिकारी
नगर परिषद वानाडोंगरी

क्र अका/युएलसी/कावि /५२९८/२००९
अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी
नागरी जमीन कमाल धारणा कार्यालय
नागपुर दिनांक २९/०६/०९

प्रति,

१) मुख्यधिकारी,
गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपुर.

२) सचीव,
ग्राम पंचायत वानाडोंगरी.

विषय :- तळेगाव दाभाडे योजनेअंतर्गत शासनास विनामुल्य प्राप्त झालेल्या क्षेत्राबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मौजा वानाडोंगरी येथील सर्वे नंबर, १०० आराजी २७५०० चौ.मी जमीनीवर इकडील कार्यालयाचे आदेश क्र एटीपी/युएलसी/टिडी (५७१)/२००५/१३०७, दिनांक ७/१०/२००५ रोजी तळेगाव दाभाडे भुखंड विकास योजना मंजुर करण्यात आलेली आहे.

या योजनेअंतर्गत शासनास विनामुल्य ५२७५.०० चौ.मी क्षेत्र प्राप्त झालेले असून उक्त क्षेत्र जमीन मालकाने बाजारमुल्य किंमत शासनाकडे जमा करुन परत मिळण्याबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने उक्त जमीन जमीनमालकास परत देण्याबाबत स्थानिक नियोजन प्राधिकरण या नात्याने आपली काही हरकत आहे किंवा कसे याबाबत हे पत्र प्राप्त झाल्यापासुन सात दिवसाचे आंत कृपया या कार्यालयास कळविण्यात यावे.

ग्रा. क्र .....
दि. ३०/०६/०९

अपर जिल्हाधिकारी तथा
सक्षम प्राधिकारी नाजकधा, नागपुर

कार्यालय नगर परिषद वानाडोंगरी

तह . - हिंगणा , जिल्हा नागपुर

जा. क्र. न.प.वा.न.र.वि/रेखांकन आखणी/ ६२१

दिनांक : २९/ ११/ २०२०

प्रति,

श्री. मनोज गोलवार व इतर

द्वारा डिझाइन सेल, दि एज,

पश्चिम हाय कोर्ट रोड १२, शंकरनगर

नागपूर

विषय : मौजा वानाडोंगरी तह, हिंगणा जिल्हा नागपूर पहन ४६ भूमापन क्र. १०० आराजी २.९० हे.आर अभिन्यासाला सुधारित निवासी भूखंड प्रयोजनार्थ रेखाकण आखणी करण्याबाबत.

संदर्भ : १) आपला दिनांक ०२/११/२०२० चा अर्ज क्र ७६७६.

२) मा. सहायक संचालक, नगररचना, नागपूर यांचे पत्र क्र. अकृषी परवानगी/ मौज/ता. /ससनाग २७९४ / दिनांक १५/०७/२००६.

३) मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचे पत्र क्र. प्रस्तुत/ जिल्हाधिकारी /कावी-१०७७/ २००४, रामाक्र २८६/एन.ए.पी. ३४/२००३-०४ दिनांक १३/०४/२००४ अन्वये.

संदर्भित क्र. ३ नुसार मौजा वानाडोंगरी तह. हिंगणा जिल्हा नागपूर पहन ४६ भूमापन क्र. १०० आराजी २.९० हे.आर. अकृषिक जागेवरील प्रस्तावित रेखांकनास श्री. मनोज गोलावर व इतर यांनी निवासी अभिन्यास सुधारित रेखांकन मंजूर करणेबाबत संदर्भ क्र. १ अन्वये विनंती केलेली आहे. मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचे पत्र क्र. प्रस्तुत: जिल्हाधिकारी /कावी-१०७७/ २००४, रामाक्र २८६/एन.ए.पी. ३४/२००३-०४ दिनांक १३३/०४/२००४ अन्वये अकृषिक परवानगी प्राप्त झालेली आहे. आपण या कार्यालयास सादर केलेला रेखाकन नकाशा योजनेच्या विकास व प्रोत्साहन नियमावलीच्या तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्र. नरवि/न.प.वा/३०७८/२०१९ दिनांक ०२/०३/२०१९ नुसार अभिन्यास विकास शुल्क व सुरक्षा ठेव रक्कम रु. ११,४४,८५८/- पावती क्र. १०७६ दिनांक ०२/०३/२०१९ ने भरणा केलेला आहे. करिता उक्त जागेवर सुधारित रेखांकनास भूखंड निवासी या प्रयोजनार्थ मंजूर करणेबाबत मौक्यावर रेखांकनाची आखणी करून विकास करण्यास व रेखांकनाला खालील अटी व शर्ती वर आखणीची शिफारस करण्यात येत आहे .

अटी व शर्ती :

१) सोबत जोडलेल्या रेखांकन नकाशानुसार उप अधीक्षक भूमी अभिलेख हिंगणा यांचेकडून जागा आखणी करून घ्यावी. आखणी केलेल्या रेखांकनाची मोजणीची 'क' प्रतिच्या मूळ प्रतीसह अंतिम रेखांकन तयार करून वास्तुतद्यांचे स्वाक्षरीने अंतिम मंजुरीस्तव चार प्रतीत सादर करावे.

२) प्रस्तावित रेखाकनास निवासी भूखंड या रहिवासी प्रयोजनार्थ आखणीची शिफारस केलेली आहे . त्याखेरीज इतर

वापर अनुज्ञेय होणार नाही.

३) भविष्यात भूखंडाचे विभाजन करता येणार नाही.

४) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४७ अ अन्वये नमुद केलेल्या दराने रूपांतरण करण्याचा आणि त्याबद्दलचा अकृषिक सारा आकारणीचा भरणा करून महसूल अधीकाऱ्याकडून सनद प्राप्त करून घेण्याची जबाबदारी अर्जदारास राहील.

५) अंतिम मंजुरी अखेरीस मागणीपत्रानुसार रु. ११,४४,८२८ /- चा भरणा केल्याची पावती सादर करणे आवश्यक आहे त्याखेरीज अंतिम मंजुरी प्रदान करता येणार नाही.

६) रेखांकनातील भूखंडावर असलेले/ करावयाचे बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक योजना व नगररचना अधिनियम १९६ कलम ४४, ४५ व महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक वसाहत अधिनियम १९६५ चे कलम ४१ अन्वये या कार्यालयाकडून मंजूरी प्राप्त करून घेण्यात यावी.

७) विषयांकित जमिनीतून विद्युत वाहिनी दूरध्वनी वाहिनी प्रवाहित होत असल्यास उक्त वाहिनीचे प्रवाहास बाधा होणार नाही, अशारितीने संबंधित विभागाच्या अद्यावत नियमानुसार आवश्यक त्या सामासिक अंतरावर स्थानांतरित करावे लागेल.

८) रेखांकनाची आखणी करताना उक्त रेखांकनामध्ये प्रस्तावित केलेले १०% खुली जागा व १०% सुविधेची जागा (खुले वाहनतळ), Gov. Share कायम राखून त्याचा विकास करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

९) विषयांकित जमिनीतून जमिनीलगत जल वाहिनी पाण्याचे स्रोत प्रवाहित होत असल्यास संबंधित विभागाचे पाटबंधारे, जल सिंचन विभागाचे ना - हरकत घ्यावे लागेल.

१०) पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain - Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागत

११) जमिनीचे मालकी हक्काबाबत महसूल विभागाचे स्तरावरून खात्री करून घेणे आवश्यक राहील.

१२) अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठ्याची व सांडपाण्याची प्रक्रिया (Water Treatment Plant) करून विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमीन मालक / विकासक यानी स्वखर्चाने करणे आवश्यक राहील.

१३) उक्त अभिन्यासातील सेवा मार्ग व इतर रस्ते विकसित करून सेवा मार्ग नगर परिषद बाभाडोगरीला विनामूल्य हस्तांतरित करणे बंधनकारक राहील.

१४) सद्यस्थितीत सदर रेखांकनामधील विद्यमान प्रस्तावित बांधकामास महानगर प्रादेशिक नियोजन प्राधिकरण बोईसर विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावली नुसार सदर जागेत सामान्यत: ०.२० इतका चटई क्षेत्र निर्देशांक लागु राहील. अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशाक प्रीमियम अदा करून मंजूर करून घेणे बंधनकारक राहील.

१५) उक्त जागा नवनिर्मित नगर परिषद बाभाडोगरी क्षेत्रात समाविष्ट झालेली असल्याने नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्राकरिता लागू विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावलीच्या तरतुदी लागु असतील

१६) विद्यमान प्रस्तावित इमारतींच्या सभोवताल किमान १.५० मी. रुंद सामासिक अंतर सोडणे व राज्य रस्त्यावरील मुख्य जिल्हा मार्ग इतर जिल्हा मार्ग यावरील स्थित इमारती करीता महामार्गाचे नियमानुसार अन्तर सोडणे बंधनकारक राहील.

१७) विद्यमान प्रस्तावित इमारतीची उंची लागू विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावलीच्या तरतुदी लागु असतील.

१८) सदर जागेतील बांधकामाकरिता Maharashtra Fire Prevention and Life Safety Measure Act. 2006 नुसार Advisor / Chief Fire Officer कडील ना - हरकत मंजूरी प्राप्त करून सादर करणे आवश्यक राहील.

१९) रेखांकनातील जागेत विद्यमान वृक्ष असल्यास अभिन्यास आखणी करताना ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम

ठेवणे बंधनकारक राहील.

२०) रेखांकनातील जागेत प्रती १००.०० चौ.मी. क्षेत्रफळास एक याप्रमाणे रस्त्यालगत खुल्या जागेत वृक्षाची लागवड करावी. जेणेकरून पर्यावरणाचा समतोल राखता येईल.

२१) मोक्यावर वृक्षाची विद्यमानता विचारात घेता प्रस्तुत प्रस्तावाची मोक्यावर आखणी करण्यात यावी.

२२) वरील अटींची पूर्तता करतांना रेखाकनात काही फेरबदल झाल्यास सुधारित रेखाकनास नगर परिषदेची मंजूरी प्राप्त करून घ्यावी लागेल विना मंजुरीने केलेले कोणतेही बदल मान्य होणार नाही.

उपरोक्त शिफारस ही नियोजनाचे दृष्टीने करण्यात आली असून जागेचे मालकी हक्क व इतर तदनुशंगिक अभिलेख या जाबत आपले शासन स्तरावरून खात्री करून घेण्यात यावी. सदर प्रकरणी आखणीची शिफारस करण्यात येत असलेले रेखांकनाची एक प्रत या कार्यालयाचे अभिलेखी ठेवून उर्वरित दोन प्रती यासोबत पाठविण्यात येत आहेत.

सहपत्र - वरील प्रमाणे

Photocopy 11/11/2020

मुख्याधिकारी
नगर परिषद बाभाडोंगरी

प्रतीलीपी माहिती व कार्यवाहीस्तव सविनय अग्रेषित.

१) तहसीलदार, हिंगणा यांना उक्त आखणीची शिफारस केलेल्या रेखांकनाचे प्रतीसह आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

२) उप अधीक्षक भूमी अभिलेख, हिंगणा यांना उक्त आखणीची शिफारस केलेल्या रेखाकनाचे प्रतीसह मोक्यावर आखणी करण्यास्तव आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

Photocopy 11/11/2020

मुख्याधिकारी
नगर परिषद बाभाडोंगरी

श्री.आनंदराव भरकाडे, अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, नागरी जमिन कमाल धारणा, नागपूर यांचे समोर.

ना.ज.क.धा. मामला क्रमांक १७४/२००५.

आवेदक/जमिनधारक :- श्री. मनोज वसंतराव गोलावार व इतर-१,
व्दारा- डॉ.अजिज खान हॉस्पीटल समोर,
धंतोली, नागपूर.

Additional Collector & Competent Authority Urban Land Ceiling Nagpur.

आ दे श

(नागरी जमिन कमाल धारणा अधिनियम, १९७६ चे कलम ८(४) नुसार)

(पारित दिनांक 5/2/05)

ज्याअर्थि, जमिनधारक श्री.मनोज वसंतराव गोलावार व इतर-१ व्दारा- डॉ.अजिज खान हॉस्पीटल समोर, धंतोली, नागपूर यांनी नागरी जमिन कमाल धारणा अधिनियम, १९७६ चे कलम ६(२) खाली विवरणपत्र दिनांक २२/६/२००५ रोजी दाखल केले.

आणि ज्याअर्थि, जमिनधारकांनी धारण केलेल्या जमिनीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	गावाचे नांव	सर्व्हे नंबर	क्षेत्र चौ.मि.
१.	वानाडोंगरी	१००	२९०००.००

आणि ज्याअर्थि, जमिनधारकांनी धारण केलेली जमिन शासनाने सन १९७६ मध्ये मंजूर केलेल्या प्रादेशिक योजनेमध्ये औद्योगिक वापराकरीता तसेच शासनाने सन २००० मध्ये मंजूर केलेल्या सुधारित प्रादेशिक आराखडयामध्ये सदर जमिन कृषी वापराकरीता दर्शविली आहे. परंतू, सदर जमिनीचे जमिनधारकांनी मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्रमांक प्रस्तु./ जिल्हाधिकारी/ कावि-१०७७/२००४ दिनांक १३/४/२००४ अन्वये सदर जमिनीचे रहिवासी वापराकरीता बिगरकृषी रुपांतर केल्यामुळे सदर जमिनीस नाजकधा अधिनियम, १९७६ च्या तरतूदी लागू करण्यात येत आहेत.

आणि ज्याअर्थि, जमिनधारकांनी प्रकरणात सादर केलेल्या माहितीचे आधारे नाजकधा अधिनियम, १९७६ चे कलम ८(२) नुसार प्रारुप विवरणपत्रामध्ये २७५००.०० चौ.मि. क्षेत्र अतिरिक्त दर्शवून कलम ८(३) ची नोटीस जमिनधारकास बजावण्यात आली.

--२--

आणि ज्याअर्थि, जमिनधारकांनी प्रारुप विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेले १५०० चौ.मि. चा एक अनुज्ञेय हिस्सा मंजूर केला असून तो मान्य असल्याबाबत जमिनधारकांनी कळविले आहे.

त्याअर्थि, जमिनधारकांनी प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांचे तसेच स्थळ निरीक्षण अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जमिनधारकांनी मौजा- बागाडोंगरी, सर्वे नंबर १०० मधील एकूण २९००० चौ.मि. क्षेत्र धारण केले आहे. सदर प्रकरणातील जमिन यापूर्वीचे नाजकथा मामला क्रमांक २६६८/७६ मध्ये अतिरिक्त घोषित करण्यात आली होती. सदर प्रकरणातील जमिन सन १९७६ च्या मंजूर प्रादेशिक योजनेमध्ये औद्योगिक वापराकरीता होती. आता शासनाने सन २००० मध्ये मंजूर केलेल्या सुधारित प्रादेशिक आराखड्यामध्ये सदर जमिन कृषी वापराकरीता दर्शविण्यात आली आहे. तसेच सदर जमिनीचे जमिनधारकांनी मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे गैरकृषी आदेश दिनांक १३/४/२००४ अन्वये रहिवासी वापराकरीता गैरकृषी रुपांतर केले असल्यामुळे सदर जमिनीस नाजकथा अधिनियम, १९७६ च्या तरतूदी लागू करण्यात येत आहेत. जमिनधारकांनी प्रारुप विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या अतिरिक्त क्षेत्राबाबत काही आक्षेप नसल्याबाबत कळविण्यात आल्यामुळे सदर प्रकरणात जमिनधारक श्री.मनोज वसंतराव गोलावार यांना १५०० चौ.मि. चा एक अनुज्ञेय हिस्सा मंजूर करण्यात येत आहे. जमिनधारकांचे एकूण क्षेत्र २९००० चौ.मि. क्षेत्रामधून अनुज्ञेय हिस्स्याचे १५०० चौ.मि. क्षेत्र वजा केल्यास जमिनधारकांकडे २७५००.०० चौ.मि. अधिकचे क्षेत्र शिल्लक राहते व हे क्षेत्र मी या आदेशान्वये अतिरिक्त मोकळे क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे. जमिनधारक या अतिरिक्त मोकळ्या क्षेत्रावर हा आदेश पारित झाल्यापासून ६० दिवसांचे आंत तळेगांव दाभाडे धर्तीवरील भूखंड विकास योजना दाखल करु शकतात. वरील कालावधीत योजना दाखल न केल्यास अतिरिक्त घोषित क्षेत्र शासनास समर्पित करण्यात येईल. जमिनधारकांना नागरी जमिन कमाल धारणा अधिनियम, १९७६ चे कलम ९ नुसार अंतिम विवरणपत्र व नकाशा बजावण्यात यावा.

(आनंदराव भरकाडे)
अपर जिल्हाधिकारी तथा
सक्षम प्राधिकारी, नाजकथा नागपूर.

प्रत,
१. तहसिलदार, हिंगणा यांना माहितीस तथा आदेशाची नोंद जमिनधारकाचे ७/१२ मध्ये घेण्याकरीता अग्रेषित.
२. जमिनधारक श्री.मनोज वसंतराव गोलावार व इतर-१, राहणार- नागपूर यांना माहितीस अग्रेषित.

अपर जिल्हाधिकारी तथा
सक्षम प्राधिकारी, नाजकथा नागपूर.

कार्यालय नगर परिषद, वानाडोंगरी

ता. हिंगणा, जि. नागपूर

जा.क./न.प.वि./न.प.वा. क्र. ३०७८ २०१९ दिनांक :०२/०३/२०१९

प्रति,
श्री. मनोज गोलावार व इतर,
व्दारा डिझाईन सेल, दि. ऐज,
१२, शंकर नगर नागपूर, पश्चिम हायकोर्ट रोड

विषय :- सर्वे क्रमांक १००, प.ह. क्र. ४६, आराजी २.९० हेक्टर च्या अभिन्यासाला निवासी वापरा करीता परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ :- आपला दिनांक २/११/२०१८ चा अर्ज क्र. ७६७६

महोदय,

आपण अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची छानणी केली असता पुढील प्रमाणे निदर्शनास येते.

१. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी पत्र क्र. –प्रस्तुत/जिल्हाधिकारी/कावी-१०७७/२००४ मौजे वानाडोंगरी, ता. हिंगणा, रा.मा.क्र. २८६/एन.ए.पी.-३४/२००३-२००४, दिनांक १३/०४/२००४ व्दारा सर्वे क्र. १००, प.ह. क्र.४६, आराजी २.९० हेक्टर ला निवासी अकृषक परवानगी दिलेली आहे.

२. मा अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, नागरी जमीन कमाल धारणा, नागपूर यांनी मामला क्र. १७४/२००५, दिनांक ०५/०९/२००५ नूसार विशीष्ट अटींवर निवासी वापरा करीता अकृषक परवानगी दिलेली आहे.

३. मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी तसेच सक्षम प्राधिकारी, यु.एल.सी., नागपूर यांनी त्यांचे आदेश क्रमांक ATP / ULC / TD (5717) / Wanadongari / 2005 / 1307 दिनांक ०७/१०/२००५ व्दारा परवानगी दिलेली आहे.

४. मा. सहायक संचालक, नगर रचना, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक –अकृषी परवानगी/मौजा-/ता. /ससनाग/२७९४, दिनांक १५/०७/२००६ व्दारा काही अटी व शर्तीवर सदरची परवानगी मा. जिल्हाधिकारी, नागपू र यांचे पत्र क्र. काबी-३५६, दि. ०२/०३/२००६ च्या अनुषंगाने, परवानगी दिलेली आहे

५. तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख हिंगणा यांची "क" प्रत मोजणी मामला क्रमांक ३४/०६ मोजणी दिनांक ०२ व ०३/०३/२००७ चा नकाशा अर्जासोबत आहे.

६. अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, ना.ज.क.धा. कार्यालय, नागपूर दि. २९/०६/२००९ चे तळेगांव दाभाडे यांचे अंतर्गत शासनास विनामुल्य प्राप्त झालेल्या क्षेत्राबाबतचे पत्र क्र. अक्र/युएलसी/कावी-५२६/२००९.

७. दिनांक १६/०७/२००९ चा ग्राम अधिकारी, ता.स.क्र. ४६ वानाडोंगरी यांचा अहवाल – सर्वे क्र. १००/२मधील ५२७५ चौ.मी. जमीन नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर यांचे नावे झाल्याचे पत्र व त्याची दि. १८/०१/२०१८ चा सातबारा उतारा.

८. आर्किटेक्ट प्रशांत सातपूते यांनी तयार केलेला सर्वे क्र. १००, प.ह. क्र. ४६, मौजा-वानाडोंगरी, ता. हिंगणा, ज नागपूर चा सुधारित अभिन्यास नकाशा.

वरील सर्व नमूद कागदपत्रांचे तसेच त्यासोबत प्राप्त झालेल्या सर्वे क्र. १०० च्या अभिन्यासाचे अवलोकन व पडताळणी केली असता सदरचा अभिन्यासाला वेळोवेळी संदर्भाधिन अधिका-यांनी मंजूरी दिलेली असून नियमाप्रमाणे सोडवायाच्या शासकिय हिस्याचे हस्तांतरण सुध्दा नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर यांना झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन आढळून येते.

आपण सादर केलेला अभिन्यास सर्व साधारणपणे नियमानूसार असून तो तळगांव दाभाडे योजने अंतर्गत प्रस्तावीत असलेल्या भुखंड क्षेत्रानूसार आहे.

मात्र अभिन्यासातील पुर्व पश्चिम १२ मी. रुंदीचा रस्ता जो पुढे १५ मी. रुंदीच्या रस्त्याला मिळतो त्याच्या पश्चिम भागातील सुमारे ७ मी. लांबीच्या रस्त्यावर बगीच्याचे अतिक्रमण आहे. ते काढणे आवश्यक आहे त्यानंतरच आपणांस अंतिम परवानगी देता येईल.

मुख्याधिकारी
नगर परिषद, वानाडोंगरी